## प्रकरण तिसरे

### समर्थसंप्रदाय आणि गिरिधरस्वामी

पंथीयतत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचे प्रयोजन महाराष्ट्रातील धर्मपंथ व त्यांची परंपरा. (अ) रामदासी आणि इतर संप्रदाय. (ब) महानुभावपंथ. (क) दत्तसंप्रदाय. (ड) भागवतसंप्रदाय (वारकरी) (इ) नाथपंथ

रामदासकालीन परिस्थिती -- १. रामदासीपंथाचा उदय व रामदासांचे वैशिष्ट्य. २. रामदासांचा वेगळेपणा. ३. रामदासांची गुरुपरंपरा. ४. संप्रदायाचे नाव. ५. संप्रदायाची दैवते. ६. संप्रदायाची तीर्थस्थाने.

संप्रदायाचे तत्त्वज्ञान -- १. पाहावे आपणासि आपण। या नाव ज्ञान २. ब्रह्म आणि माया ३. नासे ते माया सगुण. ४. अविनाश ते ब्रह्म निर्गुण. ५. मायोद्भव आणि संहारणी. ६. सगुणभक्ती आणि निर्गुणोपासना. ७. सांप्रदायिक आचार संहिता -- १) सांप्रदायिक वेष २) नित्यनैमित्तिक आचार.

रामदासांची शिष्यपरंपरा -- १. श्रेष्ठ २. दिनकरगोसावी. ३. बाळकराम. ४. कल्याण ५. उद्धवस्वामी. ६. देवदास. ७. भीमस्वामी. ८. मेरुस्वामी/रामदासी. ९. आत्माराम महाराज येल्केहाळीकर. १०. वेणाबाई. ११. अक्काबाई उर्फ आक्काबाई. समारोप. निष्कर्ष.

## पंथीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचे प्रयोजन

'गिरिधर : व्यक्ती आणि वाङ्मय' ह्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी रामदासी पंथाच्या तत्त्वज्ञानाचा व त्या पंथाच्या परंपरेचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. सतराव्या शतकातील हा संप्रदाय कोणत्या परिस्थितीत निर्माण झाला ! गिरिधर हे रामदासी पंथीय कवी असल्याकारणाने, ह्या रामदासी पंथाची वाटचाल कशी झाली ; त्या सांप्रदायिकांचे तत्त्वज्ञान कोणते इत्यादी गोष्टींविषयी माहिती ~~कल्पना~~ असणे आवश्यक आहे.

मान्यवर अशा संशोधकांनी या पंथाविषयी, तत्त्वज्ञानाविषयी मान्य केलेले निर्णय येथे संक्षेपाने पाहायचे आहेत.

## महाराष्ट्रातील धर्मपंथ

महाराष्ट्रातील धर्मपंथ व त्याची परंपरा फार पुरातन काळची आहे. कारण 'आमच्या जीवनाच्या केन्द्रस्थानी धर्माचीच आम्ही प्रस्थापना केली होती. प्राचीन आणि मध्ययुगीन संस्कृतीच्या घडणीमध्ये धर्माचा फार मोठा वाटा आहे. म्हणूनच धर्म म्हणजेच संस्कृती असे समीकरण मांडत होतो. पण वास्तविक पाहता धर्म हे संस्कृतीचे एक अंग आहे. संस्कृतीच्या भौतिक अंगाची जोपासना विज्ञान करते, तर अ-भौतिक अंगाकडे धर्म लक्ष पुरवितो. जीवनातील शुध्द तत्त्वांचा शोध घेणाऱ्या धर्मामुळे जीवनाच्या उदात्त स्वरूपाचा साक्षात्कार होतो. या धर्माचे स्वरूप इतिहासकाळात वेळोवेळी बदलत गेले आहे."[१] त्याची चर्चा येथे करावयाची आहे.

सुरुवातीच्या काळापासून ११ व्या तेराव्या शतकापर्यन्त शंकराचार्यप्रणीत मायावादी अद्वैतवादाची छाप महाराष्ट्रातील बुध्दिवंतांच्यावर पडलेली होती आणि सर्वसामान्य लोकांचे जीवन स्मृतिप्रणीत आचारधर्माला अनुसरून वर्णाश्रमधर्माच्या चौकटीने आखून दिलेल्या पध्दतीने चालू होते. कर्मसिध्दांत आणि पुनर्जन्म यांच्यावरील परंपराप्राप्त दृढ विश्वासामुळे आपल्या भौतिक जीवनाबाबतही सामान्य माणसे दैववादी वृत्तीने वागत होती. आणि वर्णजातिकुलग्रामपरत्वे ठरून गेलेल्या

धर्मप्रमाणे आपआपली कर्तव्यकर्मे करीत जीवन कंठीत होती. त्यांत निष्ठेपेक्षा परंपरागत अंधश्रध्दाच प्रकट होई. परंतु बाराव्या तेराव्या शतकात सांस्कृतिक प्रबोधनाची लाट अुसळली आणि ह्या वैदिक धर्मातील विषमतेला विरोध करणाऱ्या जैन, शैव, वैष्णव, नाथ, लिंगायत, महानुभाव या संप्रदायांनी देशी भाषांच्या द्वारा सर्वसामान्य जनतेत आपल्या धर्मतत्त्वाचा प्रचार सुरु केल्यामुळे त्यांच्या शिकवणुकीचा पगडा लोकांच्या मनावर बसू लागला. कारण पुरातन वेद, अुपनिषदे, षड्दर्शने अित्यादि वैदिक धर्मग्रंथ संस्कृत भाषेतच होते. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला ती असून नसल्यासारखीच होती. तेव्हा सर्वसामान्य जनतेला समजेल अशा प्राकृत भाषेत त्याची रचना करणे आवश्यक होते. म्हणून अितर वैदिक धर्मविरोधकांनी प्राकृत भाषेद्वारा धर्मप्रचार करण्यास सुरुवात केली. येथे निरनिराळ्या पंथांच्या स्थूल अभ्यासाचे प्रयोजन नसल्यामुळे फक्त पंथांचा अुल्लेख केला आहे.

## [अ] रामदासी आणि अितर संप्रदाय

मध्ययुगीन भारतीय साधनेतील निरनिराळे संप्रदाय हे [काही भागातील] अेकमेकात मिसळून गेलेले आहेत हे आपल्या लक्षात येते. वेगवेगळ्या तत्त्वज्ञानाला अुरीअुरी बाळगणारे हे पंथ आपआपसात कोठेतरी साम्यभेद दाखवितात. पंथाचा विचार करताना ह्या साम्यभेदाचा विचार करणे आवश्यक ठरते.

## [ब] महानुभाव पंथ

महानुभावीय तत्त्वज्ञान द्वैताधिष्ठित आहे तर रामदासी तत्त्वज्ञान अद्वैतवादी आहे. पण दोन्ही पंथात साम्य पुष्कळ सापडते. शिष्याने भिक्षा मागून अुपजीविका करावी असे दोन्ही पंथात आहे. अीश्वर प्राप्तीसाठी साऱ्यांना समान अधिकार दोन्ही पंथानी दिले आहेत. आत्मिक अुध्दारासाठी स्त्री-पुरुषभेद दोन्ही पंथात मान्य नाही. महानुभावीय स्त्रिया - महदंबा, आअुसा, मेनावती तर रामदासीपंथीय - वेणाबाई, आक्कायाबाई वि. प्रसिध्द आहेतच.

## [क] दत्तसंप्रदाय

हा संप्रदाय १५ व्या शतकात निर्माण झाला. दत्तात्रेयाच्या कथा

मार्कंडेय पुराणात, शिवपुराणात, हरिवंशात आल्या आहेत. दत्तात्रय अमर आहे अशी सांप्रदायिकांची धारणा आहे. योगसाधना, वैराग्यवृत्ती, वेषभूषा वि. संबंधात रामदासी व दत्त संप्रदायात थोडेफार साम्य आढळते.

[३] भागवतसंप्रदाय (वारकरी)

पंढरीच्या पांडुरंगाची भक्ती करणारा त्याच्याशी अद्वैत प्राप्त करुन घेणारा तुळशीमाळ घालणारा भागवत असतो. "जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।।[2]" अशी त्याची दृष्टी असते. भागवत संप्रदायाचे तत्त्वज्ञान भागवताच्या एकादशस्कंधात श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितले आहे. विठ्ठल हे ह्या संप्रदायाचे उपास्य दैवत तर 'ज्ञानेश्वरी' हा प्रमुख ग्रंथ आहे. त्या विठ्ठलाचे वर्णन 'युगे अठ्ठाविस विटेवरी उभा' असे ~~ज्ञानेश्वर~~ नामदेव करतात. आपले सर्वस्व विठ्ठलालाच भक्तीच्या माध्यमाने अर्पण करावयाचे असते. नवविधाभक्तीचा प्रभाव ह्या पंथात अधिक आढळतो. भक्ती हेच आत्मोध्दाराचे साधन ते मानतात. 'भक्ति ते मूळ ज्ञान ते फळ, वैराग्य केवळ तेथिचे फूल' अशी या पंथाची विचारसरणी आहे.

परंतु वारकरी आणि रामदासी या दोघांच्या जीवननिष्ठेत काही मूलगामी फरक नाही. ज्ञानेश्वराचा भक्तियोग कर्मप्रधानच आहे. त्यात संन्यासवादाला थारा नाही. तसेच रामदासांचा प्रयत्नवादही अध्यात्मनिष्ठच आहे. त्यात जडवादाला जागा नाही. दोघांच्याही स्फुट लेखनात प्रसंगपरत्वे कधी प्रवृत्तिपर तर कधी निवृत्तीपर असे उद्गार आढळतात. 'प्रपंच करावा नेटका' या उद्गारा-प्रमाणे 'संसार मुळीच नासका ।' असेही उद्गार रामदासांनी काढले आहेत. तर वारकरी पंथाचे कळस असलेले संत तुकारामांनी 'नको नको गुंतू मायाजाळीं ।' असे सांगून, तुकाराम 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास विचारे वेच करी ।।[3]' असा आदर्श गृहस्थाश्रमाचा विचार सांगतातच. तर एकनाथांनी प्रपंच आणि परमार्थ यांची लौकिक व अलौकिक दोन्ही पातळ्यांवर यशस्वी सांगड घालून दाखविली.

[४] नाथपंथ

नाथसंप्रदाय हा शैव असल्यामुळे शिवोपासनेला या संप्रदायात महत्त्व आहे.

शिवाच्या विच्छेने सर्व सृष्टी निर्माण होते आणि त्याच्यातच विलीन होते ही भावना आहे. नवनाथाप्रमाणे ८४ नाथांचे महत्त्व आहे. हठयोगी, अवधूत, कानफाटे वित्यादि नावे या पंथास आहेत. शक्तियुक्त शिव हे अंतिम सत्य मानतात. आचार-पध्दतीही निराळी आहे. ज्ञानेश्वर हे मूळचे नाथपंथी, पुढे त्यांनी सर्व धर्म समावेशक असलेला भक्तिपंथ निर्माण केला तो धागा अबाधित ठेवून रामदासांनी पुढे आपल्या पंथाची उभारणी केली. अशात-हेने वैदिक धर्माच्या बंदिस्त स्वरूपामुळे आणि कर्मकांडाच्या प्राबल्यामुळे निरनिराळे धर्म, संप्रदाय निर्माण झाले, त्याच प्रेरणेने सोळाव्या शतकात रामदासांनी आपला हा रामदासी पंथ अेक वेगळ्याच निष्ठेने कालाची गरज ओळखून प्रस्थापित केला. कारण त्यापूर्वीचे 'संत हे सहिष्णुतावादी भागवत धर्माचे प्रचारक तर समर्थ रामदास जयिष्णू नि मुमुक्षू अशा महाराष्ट्रधर्माचे प्रचारक'[४]. कारण समर्थांनी शिवाजीचे गुरूपद स्वीकारून त्यांच्या राजकारणात त्यांना मार्गदर्शन केले. अतअेव समर्थ रामदास हे राष्ट्रगुरू ठरले. हेच निराळेपण वितर संतापेक्षा रामदासांचे दिसते. ते त्यांच्या पंथाला उपयोगी असेच ठरले.

## रामदासकालीन परिस्थिती

ज्ञानेश्वर, नामदेव वित्यादी संत ~~प्रभृतींच्या~~ जाऊन तीन-चार शतके लोटली होती. तरी त्यांच्या वाङ्मय संभारामुळे जनजागृती झाली होती. हिंदूधर्माच्या अस्मितेला धक्का न असता राज्यकर्ते राज्यव्यवहार चालवीत असत, पण पुढच्या कालखंडात मात्र महाराष्ट्रात अराजकता सुरू झाली होती. दक्षिणेकडील राजवटीतून मुसलमान आणि मोंगल यांचा अेक सारखा संघर्ष चालूच होता. या सर्व राजकीय संघर्षात सामान्य जनता होरपळून गेली. लुटालूट, जाळपोळ, स्त्रियाविषयी अनाचारवृत्ती, ढोंगीसाधू, नाना आचार या सर्व गोष्टीमुळे समाज विस्कळीत झाला होता.

या शतकात भारतीय धार्मिक आणि सामाजिक अधिकारांची व संचलनाची सूत्रे वैदिक धर्मानुयायांच्या हाती होती. वैदिकधर्म सगळीकडे प्रसारित होताच परंतु वैदिकधर्माच्या जोडीला वितर धर्मपंथही अस्तित्व टिकवून होते. जैन, बौध्द, महानुभाव, नाथ वि. धर्मपंथ ह्या काळात आपल्या तत्त्वज्ञानाचा आपआपल्यापरीने प्रसार करीत होते. तरी ही वैदिक धर्माची श्रेष्ठता सर्वसामान्य होतीच. ~~वैदिकधर्मात~~ पंथीयात

अस्तित्वात असलेले जातीयता, स्पृश्यास्पृश्यता, विषमता हे भेद अतिशय प्रकर्षाने जाणवत होते. आत्मोन्नतीचा किंवा आध्यात्मिक ज्ञानाचा अधिकार विशिष्ट जाती--साठीच मर्यादित होता. त्यामुळे सर्वसामान्य लोक उपेक्षित होते. सर्व--सामान्यांसाठी मोक्षाची कवाडे बंद होती. आचारधर्म आणि कर्मकांड ह्यांचेच प्राबल्य समाजमनावर होते. 'कुलकुल्या मधुकुल्या' ह्याच मार्गाने सामान्य माणूस जात होता. धर्म जातीयता आणि विषमता यांच्या कचाट्यात अडकल्यामुळे सामान्यांची अतिशय कुचंबणा होत होती. स्नानसंध्या, जपजाप्य; यांचे माहात्म्य सांगितले जात होते, तरीही सामान्यास स्वोध्दाराचा मार्ग गवसला नव्हता.

या सा-या परिस्थितीत उबग पावलेला सामान्य माणूस इतर पंथाकडे आकर्षिला गेल्यास नवल नाही. कारण जैन, बौध्द इ. अस्तित्वात असलेले धर्म उदारमतवादी होते. त्यांनी स्पृश्यास्पृश्यता, विषमता, जातीयता आपल्या धर्मातून समूळ नष्ट करुन लोकांच्या भाषेत, सामान्य जनतेला समजेल अशा सोप्या भाषेत धर्मग्रंथ लिहीले.

या धार्मिक संक्रमणावस्थेच्या काळात, अतिशय परज्या असलेल्या इस्लामी धर्माचे आगमन भारतात झाले होते. इस्लामी धर्माच्या आगमनामुळे भारतीय समाजरचनेत ब-याच मोठ्या प्रमाणात स्थित्यंतरे होत होती. आचरण्यास सोपा व ऐहिकाचा प्राप्त करुन देणारा इस्लामी धर्म लोकांच्या आकर्षणाचा विषय ठरत होता. वैदिक धर्मापासून उपेक्षित राहिलेले कित्येक हिंदू गटागटांनी इस्लाम धर्माचा स्वीकार करु लागले.

(१) रामदासी पंथाचा उदय व रामदासांचे वैशिष्ट्य

बहुत जनांस चाळवी । नाना मंडळे हालवी ।
ऐसी हे समर्थ पदवी । विवेके होते ।।
विवेक एकांती करावा । जगदोध्दारणेने धरावा ।
लोक आपला आणि परावा । म्हणोचि नये ।।[५]

या युक्तीतच ज्यांच्या कार्याचे आणि व्यक्तिमत्त्वाचे खरे दर्शन घडू शकते, त्या समर्थ रामदासस्वामींनी, ज्ञानदेवादी संत ज्या भागवतपरंपरेत नांदले आणि भागवोत्तम ठरले, त्याच भागवत धर्माचा एक सळाळून वाहणारा स्वतंत्र प्रवाह, स्वरूप संप्रदायाच्या द्वारा प्रवर्तित केला. लोकसंस्थाच्या संरक्षणासाठी 'आपला आणि परावा' अशी भेदबुद्धी न बाळगता, 'विवेकाधिष्ठित समत्वबुद्धीने' बहुल जनांस वाळविणारी आणि नाना मंडळे हालविणारी अशी रामदास्याची परंपरा निर्माण करून समर्थांनी सकल महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून एक प्रकारचे नवचैतन्य निर्माण केले. भगवान विष्णूच्या कृष्णावताराचा एक आविष्कार म्हणजे श्रीविठ्ठल या हरि हरैक्यरूप विठ्ठलाच्या समचरणांवर लीन होऊन पूर्वीच्या संतांनी महाराष्ट्राच्या पारमार्थिक जीवनात समता प्रस्थापित करण्याचे महान कार्य केले. परंतु या समत्व भावनेचे भक्कम अधिष्ठान प्राप्त झालेल्या समाजास महत्त्वाकांक्षी बनवून त्यांच्या पुरुषार्थास आणि पराक्रमास आवाहन करण्याची आवश्यकता सोळाव्या शतकात निर्माण झाली होती. रामभक्ती बरोबर त्यांना राजकारणाशीही समन्वय साधावयाचा होता, म्हणून त्यासाठी समन्वयाचे अधिष्ठान असलेल्या उदार भागवत धर्मविचाराचा वारसा घेऊन समर्थांनी आपल्या संप्रदायाचे प्रवर्तन केले.

या संप्रदायाद्वारे "मुख्य ते हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण" साध्य करण्याची, किंवा भगवंताचे अधिष्ठान ठेवून "देव मस्तकी धरावा अवघा हलकल्लोळ करावा । मुलुख बडवावा कां बुडवावा । धर्मस्थापनेसाठी ।।"

अशा तऱ्हेने समर्थांनी 'रामदासी' पंथाची पारमार्थिक हेतुने उभारणी केलेली दिसून येते. त्याचबरोबर राजकीय घडामोडीकडेही त्यांचे ~~मुख्य उद्दिष्ट~~ लक्ष होते यात शंका नाही. स्वधर्मरक्षणाला समाजाच्या निष्कलंक चारित्र्याची, संघटित जीवनाची आणि प्रयत्नवादाची नितांत आवश्यकता असते म्हणून हे अंतिम साध्य डोळ्यासमोर ठेवून समाजाला आलेली निष्क्रीयता दूर करण्यासाठी, आत्मोद्धारा बरोबर राष्ट्रोद्धार ही साधण्यासाठी सर्व गुणांचा आदर्श अशा पुरुषार्थी 'प्रभुरामचंद्रा' सारख्या दैवताभोवती रामदासांनी आपल्या संप्रदायाचे प्रवर्तन केले. अशा तऱ्हेने स्वधर्म जागृतीची प्रेरणा त्यांनी महाराष्ट्रात निर्माण केली.

(२) रामदासांचे वेगळेपण

रामदासांचे वेगळेपण हे तुकाराम-रामदासांचा एकत्र उल्लेख करून इतर संतांपेक्षा रामदास हे अगदी वेगळ्या प्रकारचे संत होते, असे मोठ्या आग्रहाने प्रतिपादले जाते. एकोणिसाव्या शतकातील आधुनिक राष्ट्रवादी दृष्टिकोणातून शिवकालाच्या इतिहासाचा अन्वयार्थ लावताना राजवाडे-देव-भावेप्रभृती संशोधकांनी रामदासांच्या कार्याचा अतिरिक्त गौरव केला आहे. तुकाराम हे केवळ भोळेभाबडे भावभक्त तर रामदास हे राजकारणपटु महंत. तुकारामादी संत हे निवृत्तिवादी तर 'प्रपंच करावा नेटका' असा आदेश देणारे रामदास प्रवृत्तिवादी. भागवतधर्मी संत दैववादी तर रामदास हे प्रयत्नवादी. ज्ञानेश्वरादी संत वैयक्तिक मोक्षाची काळजी करणारे वारकरी, तर रामदास हे राष्ट्राच्या मोक्षाची (स्वराज्याची) काळजी वाहणारे धारकरी. संतांनी कमरेवर हात ठेवून निष्क्रिय-पणाने अठ्ठावीस युगे मौन धारण करणाऱ्या विठ्ठलाची उपासना शिकविली, तर समर्थांनी कोदंडधारी नि बंधविमोचक अशा रामाची भक्ती शिकविली. म्हणूनच मागे उल्लेख केलेल्या श्री. शेणोलीकरांच्या भाषेत, संत हे सहिष्णु भागवत धर्माचे प्रचारक तर समर्थ रामदास हे जयिष्णु नि युयुत्सु अशा महाराष्ट्रधर्माचे प्रचारक. तुकारामांनी शिवाजीच्या सत्काराकडे पाठ फिरविली तर, रामदासांनी शिवाजीचे गुरुपद स्वीकारून त्यांना राजकारणात मार्गदर्शन केले. रामदासांच्या कार्याचे हे वेगळेपण देशकाल परिस्थितीला अनुकूल असेच होते असे म्हणावे लागेल.

(३) रामदासांची गुरुपरंपरा

" आदिनारायण सद्गुरु आमुचा ।
शिष्य जाहला त्याचा महाविष्णु ।"

आदिनारायण
|
महाविष्णु
|
हंस - ब्रह्मदेव - वसिष्ठ - श्रीरामचंद्र - रामदास

अशी गुरुपरंपरा आहे. लहानपणी श्रीरामचंद्रांनी उपदेश केल्यामुळे त्यांची गुरुभक्ती एका श्रीरामचंद्रातच केन्द्रवटली होती.

(४) संप्रदायाचे नाव

श्रीसमर्थ आपल्या स्वतःला श्रीरामचंद्राचा दास म्हणवून घेत असत. त्यामुळे त्यांनी आपल्या पंथाला रामदासी संप्रदाय असे नामाभिधान दिले असावे.

(५) संप्रदायाची दैवते

प्रभुरामचंद्र, हनुमान, तुळजाभवानी ही समर्थांची तीन प्रमुख दैवते व घराण्यात परंपरेने चालत आलेली सूर्योपासनाही ते करीत.

' विठोबा तूं आमुचे कुलदैवत ।
आम्ही अनन्य शरणागत ।
तुझे पायीं असे चित्त । जीवी आर्त भेटाचे ''

अशी भागवतपरंपरेला शोभेशी आर्त वाणी ते विठ्ठलभक्तीसाठी व्यक्त करतात.

(६) संप्रदायाची तीर्थस्थाने

जांब हे त्यांचे जन्मस्थान, चाफळ येथे राममंदीराची स्थापना. टाकळीस गोदावरीच्या पात्रात उभे राहून समर्थांनी पुरश्चरण करीत १२ वर्षे घालवली. शिंगणवाडीस सन १६४९ मध्ये एका चिंच वृक्षाखाली शिवाजीराजाना समर्थांचा अनुग्रह झाला. शिवथरघळ एकांत स्थान म्हणून दासबोधरचना तेथे केली. सज्जनगडावर ६ वर्षांचा शेवटचा काल समर्थांनी घालविला.

वरील अघोरेखीत स्थळे समर्थांच्या पदस्पर्शाने पुनीत झाल्यामुळे त्या स्थळास संप्रदायाच्या दृष्टीने विशेष महत्व आहे.

## संप्रदायचे तत्त्वज्ञान

रामदासी संप्रदायची तात्त्वीक दृष्टी त्यांच्या आधारभूत ग्रंथातूनच प्रामुख्याने पाहावयास मिळते. त्यादृष्टीने पंथाचा प्रमाणग्रंथ 'दासबोध' ह्यातच पंथीय तत्वज्ञान आढळून येते. रामदासांनी सनातन, पारंपारीक अध्यात्मज्ञानाचाच पुरस्कार केला असून त्याची मांडणी मात्र नाविन्यपूर्ण आणि चिकित्सापूर्ण दृष्टीने केली आहे. त्याचा प्रत्यय खालील गोष्टीवरून येईल.

### १) पाहावे आपणासि आपण । या नाव ज्ञान

दासबोधाच्या पहिल्या ४ दशकात स्तवन, मूर्खलक्षण, सगुणपरीक्षा ~~आणि~~ नवविधाभक्ती ३० विषयां ~~अस~~ नंतर पाचव्या दशकात ज्ञान विचारांविषयी महती सांगताना ते म्हणतात 'आत्मज्ञान हेच खरे ज्ञान'. ज्या ज्ञानीयांना आत्मज्ञान प्राप्त झाले त्यांची नावे त्यांना सांगितली आहेत. सद्गुरूमुळे आत्मज्ञान प्राप्त होते हे त्यांनी आवर्जाने सांगितले आहे.

### २) ब्रह्म आणि माया

निश्चल, चंचल, जड अशी तीन तत्त्वें मिळून जग बनले आहे. ब्रह्म हे निश्चल आहे. आत्मा चंचल आहे आणि पंचमहाभूते ही जड आहेत. चंचल आणि जड ही मायिक, अशाश्वत असल्यामुळे साधकाने त्यांच्या मोहात न सापडता अचल ब्रह्मावर आपले मन केंद्रित करावे. असा त्यांच्या तत्वदृष्टीचा गाभा आहे. त्यांनी आपल्या तत्वज्ञानात मायेला अग्रक्रम दिला आहे. ते सांगताना ते म्हणतात -

' आधी मिथ्या उभारावे । मग ते बोळसोर्न सोडावे
पुढें सत्य तें स्वभावें । अंतरी आणे

(दासबोध - ७-१-४)

अशारितीने मायेच्या स्वरूपाचा आणि कार्याचा अगोदरच परिचय होवून तिचा संपूर्ण निरास झाला म्हणजे ब्रह्मप्राप्तीचा मार्ग खुला होतो.

३) नासे ते माया सगुण

मायेविषयी ते सांगतात की, जे डोळ्यांना दिसते व मनाला भासते, ते केवळ मायिक आहे. नानारुपात्मक विश्व हा मायेचा पसारा आहे. 'वस्तु म्हणजे ब्रह्म निर्गुण, निरावयव निश्चल आहे. तर माया सगुण सावयव आणि चंचल आहे. नानात्व हा मायेचा स्वभाव धर्मच आहे. त्यामुळे दिसणारे, भासमान होणारे हे मिथ्या कसे हा प्रश्न ते सज्ञान व अज्ञान असे दोन वर्ग करुन त्याचे निराकरण करतात.

४) अविनाश ते ब्रह्म निर्गुण

सातव्या दशकात ब्रह्म निरायव 'ब्रह्म निर्गुणनिराकार ब्रह्म निःसंग निराकार । ब्रह्मासि नाही पारावार । बोलती साधु (७-२-१) ब्रह्म स्वरुप शब्दातीत आहे. तेव्हा श्रवणाभ्यास हेच अेक त्यास साधन सांगितले आहे. वाचा व मन यांना अप्राप्य असे ब्रह्म सद्गुरुच प्राप्त करुन देतो. ब्रह्माच्या ठिकाणी सर्व सारखे आहे.

" उंच नीच नाहीपरी । राया रंकासि (हस्तलिखित: राकासि) सरी ।
ब्राह्मणाचे ब्रह्म सोवळे । शूद्राचे ब्रह्म ते ओवळे ।
अैसे वेगळे आगळे । केय असेचिना

(७-२-२४,२५) दासबोध

अशात-हेची परब्रह्माच्या आत्मप्रचीतीतून निर्माण झालेली समत्वदृष्टीच समर्थांच्या पारमार्थिक विचाराची होती.

५) मायोद्भव आणि संहारणी

मूळ मायेची १४ नावे सत्व, रज, तम, मन, माया, अंतरात्मा वि. मूळ मायेची सूक्ष्मातून स्थूलाकडे जाणारी गुणमाया आणि अविद्यामाया अशी दोन रुपे आहेत.

माया

| | |
|---|---|
| मूळ माया | अविद्यामाया |
| शिवसापेक्ष | जीवसापेक्ष |

समर्थांनी अंतरात्म्याचाही अंतर्भाव मायेतच केला आहे. अंतरात्म्याला (सगुण) परब्रह्म (निर्गुण) ते आत्मा असा अनेक शब्द कधी कधी वापरतात. मायोद्भवाची तेराव्या दशकात तिसऱ्या समासात म्हणजेच विश्वाच्या उभारणीची चर्चा त्यांनी केलेली आहे.

६) सगुणभक्ती आणि निर्गुणोपासना

परब्रह्माचे प्रतीक त्यांनी रामचंद्र मानले आणि रामोपासनेचा प्रचार आणि प्रसार हे समर्थांनी आपले जीवितकार्य मानले होते. त्यांच्या राजकारणाचा, व्यवहारवादाचाच तेव्हढा विचार केला जातो. परंतु हे सामर्थ्य त्यांना ज्यामुळे प्राप्त झाले, ते म्हणजे रामोपासना आणि हाच त्यांचा परमार्थ, तत्त्वबोधाचा आत्मा आहे.

सगुणातून निर्गुणाची प्राप्ती व्हावी म्हणून त्यांनी 'राम' हे दैवत आत्मारामाचे प्रतीक म्हणून निवडले. 'श्रीराम जयराम जय जय राम' हा त्रयोदश अक्षरी मंत्र त्यांनी अखंड जपला. त्यांची अशी भावना होती की, त्या मंत्राने आत्मारामाची जोड होईल व कल्पनेचे भान सहज सुटून जाईल व अद्वैताची शुद्ध कल्पना प्रकाशेल. त्यामुळे त्यांच्या (रामाच्या) उपासनेमुळे, नवविधाभक्तीचा मार्ग त्यांना अवलंबिला आणि त्यांना आत्मप्रचिती आल्यामुळेच त्यांनी इतरांसमोर 'सगुणाचे आधारे। निर्गुण पाविजे निर्धारे' असे साधनसूत्र ठेवून सगुणभावाने नटलेली अशी नवविधाभक्ती सांगितली.

७) सांप्रदायिक आचार संहिता

(१) सांप्रदायिक वेष : रामदासी ब्रह्मचारी किंवा गृहस्थी असू शकतो. कासेत कुबडी, गळ्यात भिक्षेची झोळी, हातात चिपळ्या, अंगात भगव्या रंगाचे

कौपीन, भाळी रामगुद्रा, मुखाने मनाचे श्लोक, वैराग्यवृत्तीचा आविष्कार ही रामदासी पंथाची खूण असते.

(२) <u>नित्य नैमित्तिक आचार</u> : समर्थांनी आपल्या संप्रदायात जरी आचार पद्धतीला महत्त्व दिले नसले तरी कर्मकांडाचे स्वरूप प्राप्त होवू दिले नाही.

> मुख्य हरीकथा निरूपण । दुसरे ते राजकारण
> तिसरे ते सावधपण सर्व विषयी ।। चौथा अत्यंत साक्षेप ...

ही चतुःसूत्री म्हणजे सांप्रदायिक आचाराचा बैठक होय. प्रपंच आणि परमार्थाची सांगड घालणारे ~~रामदास~~ एकमेव संत म्हणून रामदास गणले जातात. त्यांच्या 'दासबोध' ग्रंथात बालपासून तो वृद्धापर्यन्त आचार धर्माची दीक्षा दिलेली आढळते.

दैनंदिन आचारात दररोज स्नानसंध्या, दासबोध पठण, मनाचे श्लोक व करुणाष्टके वाचन अध्यात्मिक ग्रंथाचे वाचन, साधकाने भिक्षा मागितली पाहिजे हा आदेश पण भिक्षा सुध्दा मुठभरच घ्यावी हा दंडक भगवेवस्त्र परिधान करावे. मठाधिपतीने कीर्तन, भजनाद्वारे जन जागृती करावी. हनुमान जयंती व रामनवमी उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करावा वि. अशाप्रकारे प्रपंच व परमार्थ या दोन्ही तत्त्वांचा समन्वय साधल्याचे त्यांच्या आचार धर्मात दिसून येते.

<u>रामदासांची शिष्यपरंपरा</u>

'विश्वाची चिन्ता' जन्मभर करणाऱ्या समर्थांनी लोकांच्या तळमळीने देशभर हिंडून डोळसपणे सर्वत्र भोवतालची परिस्थिती पाहून ठरविले की, जनजागृतीचे काम आपल्या एकट्या दुकट्या माणसाचे नाही. त्यासाठी समग्र भारतभर भ्रमंती करून त्यांनी अनेक माणसे जोडली. त्यांनी आपल्यापुढे दोन ध्येये ठेवली. (१) उत्तम पुरुषाची निर्मिती (२) रामराज्य निर्मिती. ~~त्यामुळे~~ त्यांनी भारतभर मठ स्थापना करून असंख्य महंत त्याठिकाणी ठेवून त्यांच्याकडून जनजागृतीचे कार्य केले असल्यामुळे त्यांचा शिष्य परिवार फार

मोठा आहे. अेवढ्या सर्व शिष्यांची माहिती येथे नमूद करण्याची आवश्यकता नसल्यामुळे प्रमुख रामदासी (शिष्य) कवींचाच येथे परिचय देण्याचा प्रयत्न केला आहे.

रामदास

(पुरुषशिष्य)

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| श्रेष्ठ | दिनकर गोसावी | आळकराम | कल्याण | अुद्धवस्वामी |
| ६ | ७ | ८ | ९ | (स्त्रिया) १० |
| देवदास | भीमस्वामी | मेरुस्वामी | आत्माराम महाराज | वेणाबाई |
| | | | | आक्काबाई |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| गिरिधर | त्रिंबक | यशवंत | भीम |

वरील शिष्यांनी आपल्या मठाची व्यवस्था अुत्तम लावून संप्रदायासाठी लेखनही केले. त्यामुळे ह्या रामदासी कवींचे वाङ्मयीन कर्तृत्व फार मोलाचे आहे. परमार्थाच्या द्वारा धर्मजागृतीचे, आणि लोकसंस्थेच्या अुद्धाराचे साहित्य हे अत्यंत प्रभावी साधन आहे. हे जाणून समर्थ व त्यांच्या शिष्यांनी आपल्या साहित्याची निर्मिती केली. परमार्थज्ञानाचा आणि व्यवहाराचा कोश म्हणून समर्थांच्या 'दासबोधा'चा निर्देश करता येईल.

१) श्रेष्ठ :

श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचे ज्येष्ठ बंधु गंगाधर हे सांप्रदायी लोकांत 'श्रेष्ठ' या नांवाने व रामदासी वाङ्मयात 'रामीरामदास' या नांवाने प्रसिद्ध आहेत. श्रेष्ठ व समर्थ ह्या दोन्ही बंधूंस लहानपणीच श्रीरामाचा अनुग्रह झाला होता. समर्थांप्रमाणेच श्रेष्ठही अुत्कृष्ट ग्रंथकार होते. 'भक्तिरहस्य' व 'सुगमोपाय' हे त्यांचे दोन ओवीबद्ध ग्रंथ प्रसिद्ध आहेत. श्रेष्ठांची भाषा शुद्ध असून त्यांच्या कवितेत अितर रामदासी कवितेतल्या प्रमाणे शब्दांची अशुद्ध रचना

फारसी आढळत नाही, परंतु कवितेंत संस्कृत शब्दांचा भरणा अधिक आहे. प्राचीन संस्कृत ग्रंथाच्या अभ्यासामुळे कदाचित तो असावा. भगवद्भक्ती व नाम महिमा त्यांच्या ओव्यातून दिसून येतो.

१) दिनकर गोसावी

श्रीसमर्थांच्या प्रमुख शिष्यापैकी 'दिनकर' हे अेक होत. हे तीसगांवचे मठात महंत होते. यांनी 'स्वानुभवदिनकर' या नांवाचा मोठा ओवीबद्ध ग्रंथ व अनेकशी स्फुट कविता रचिली. हिन्दी भाषेतही त्यांचे स्फुट लेखन आहे. समर्थांच्या अुपदेशानंतर ज्या ब्रह्मसुखाचा अनुभव त्यांनी घेतला त्या अनिर्वाच्य सुखाचे वर्णन करतांना ते सांगतात की,

"सांगों जाता वाचा शब्देसीं निमाली ।
मनेंसीं विराली कल्पनाही ।। "

त्यांच्या कवितेंत रामदासस्वामींच्या शिकवणीचा आणि अेकनाथादि पूर्वकालीन व तुकारामादि समकालीन संतांच्या कवितेचीही छाप पडलेली दिसली तरी त्यांचे स्वतंत्र कर्तृत्वही त्यांत आहे.

२) आळकराम

व-हाडांत कारंजा या नांवाचें अेक लहान शहर आहे. तेथें दोन रामदासी मठ असून त्यापैकीं अेक मठ आळकरामाच्या परंपरेतला आहे. आळकराम हे समर्थ-शिष्य अनेक ठिकाणी भटकंती केल्यावर समर्थांच्या अुपदेशामुळे कारंजा येथे राहाण्यास येवून मठस्थापना केली. ह्यांचा मोठा ग्रंथ अुपलब्ध नाही. परंतु स्फुट प्रकरणे श्लोक, अभंग, आरत्या वगैरे अुपलब्ध आहेत. समर्थांनी आळकरामास जो अुपदेश केला तो त्यांनी ५४ श्लोकांत गोवला आहे. शिवाय काही पौराणिक कथाही ओवीबद्ध आहेत. त्यांची कविता अगदी साधी व सुलभ दिसते.

४) कल्याण

कल्याण हे समर्थांचे पट्टशिष्य म्हणून प्रसिद्ध आहेत. डोमगाव येथील मठाचे ते अधिपति होते. कवि ह्या नात्याने हे प्रसिद्ध नव्हते. तरी त्यांचे चरित्र

पाहिले म्हणजे 'गुरुभक्ति' हे त्यांच्या चरित्राचे रहस्य होय हे स्पष्ट दिसते. त्यांचे मूळचे नाव अंबाजी, ते कोल्हापुरास रहात. समर्थ तेथे गेल्यावर त्यांचे सुंदर हस्ताक्षर असून त्यांना त्यांनी मागून घेतले व त्यांचे नांव कल्याण ठेविले. समर्थांचे ते आयुष्यभर लेखनिक होते. त्यांनी हस्तलिखित 'दासबोध' ग्रंथ धुळे येथे सत्कार्योत्तेजक सभेत आहे. श्रीसमर्थांच्या अस्थि चाफळ येथून काशीला नेण्यास काढण्यात आल्या त्याच दिवशी डोमगांव येथे कल्याणस्वामींनी आपला देह ठेविला. केवढी ही गुरुभक्ती ! कल्याणस्वामींचे अनेक शिष्यगण होते. समर्थ-स्तुतिपर कल्याणांनी थोडीशी पदरचना केलेली दिसते.

५) अुद्धवस्वामी

हे समर्थांचे अगदी पहिले शिष्य होत. नाशिक पंचवटीपासून सुमारे तीन मैलांवर टाकळी येथे यांचा मठ आहे. येथून जवळच नंदिनी व गोदावरी नद्यांचा संगम आहे. तेथेच श्रीसमर्थांनी १२ वर्षे नदीच्या पात्रांत अुभे राहून पुरश्चरण केले. लहानपणीच समर्थांजवळ राहून त्यांच्या अंगाखांद्यावर खेळण्याचे भाग्य लाभलेले असे हे शिष्य होत. यांचीही कविता फारशी नाही. शिवाजीमहाराजांचे निर्वाण झाले तेव्हां त्यांनी त्यांच्यावर काही श्लोक लिहिलेले अुपलब्ध झालेले आहेत. समर्थांचा अखंड सहवास लाभल्यामुळे त्यांनी समर्थांचे चरित्र लिहिले असावे असा अुल्लेख ग्रंथात सांपडतो, परंतु ते अजून अुपलब्ध झालेले नाही.

६) देवदास

अहमदाबादपासून पूर्वेस १४ मैलावर दाहेगांव असून तेथे देवदासांचा मठ आहे. यांची बरीच मराठी व हिन्दी कविता अुपलब्ध आहे. जैन निजामशाहीच्यावेळी त्यांनी अनेक पदे लिहून जनजागृती केली असे श्री. देव लिहितात. त्यांची हिन्दी भाषेतील पदे तत्कालीन राजकीय पुरुषांवर लिहिलेली आढळतात. आपल्या कृष्णाजी या शिष्यासह काशीस जाअून त्यांनी तेथेच देह ठेविला.

७) भीमस्वामी

हे तंजावरचे मठपति होत. हे मूळचे शहापूरचे परंतु समर्थांनी अुपदेश दिल्यामुळे

ते तंजावर येथे गेले. शहापुरास अनुग्रह झाल्यावर भीमस्वामी बरेच दिवस कृष्णातीरी समर्थ सानिध्यांत होते. परंतु शेवटी त्यांना सोडून जातांना भीमस्वामींना वाईट वाटले ते आपल्या पत्रांत लिहितात,

"अखंडीत हे वासना भेटि व्हावी ।
प्रभूमाविची धूळ माथां पडावी । "

त्यांना तितक्याच काकुळतीने समर्थांनीही उत्तर पाठविले होते. भीमस्वामी प्रापंचिक होते. त्यांनी ५० श्लोकांत समर्थांचे लघुचरित्र लिहिले असून ते धुळे येथे आहे.

८) मेरुस्वामी/रामदासी

समर्थांचे तंजावराकडील शिष्य अनंत मौनी यांचे शिष्य हे मेरुस्वामी होत. त्यांनी आपल्या 'रामसोहळा' नामक ग्रंथांत स्वतःसंबंधाने माहिती दिली आहे. ते मूळचे कृष्णातीरच्या मेरुलिंग या गांवचे परंतु तीर्थाटन करीत असता नीलगिरीजवळ आल्यावर अरुणाचल गांवी त्यांची व अनंतमौनींची गांठ पडली. अनंतमौनी हे समर्थानुग्रहीत होते. त्यांनी मेरुस्वामींना आपल्याजवळ ठेवून घेतले व अनुग्रह दिला. दक्षिण द्वारका म्हणजे मन्नारगुडी येथे अनंतमौनी नंतर मठाधिपती झाले. मेरुस्वामींनी विपुल ग्रंथरचना केली. त्यांचे भीमोपदेश, आत्मसाक्षात्कार, स्वानंदलहरी, मानसपूजा, अनुभवसार, मेरुबोध, समर्थाष्टक, श्रीरामपंचरत्न, संतमाला, रामसोहळा इत्यादि ग्रंथ आहेत. मेरुस्वामींचे भाषाप्रभुत्व व वर्णनप्रभुत्वही चांगले आहे. हे समर्थपरंपरेतील असल्यामुळे संप्रदायाचे उपास्यदैवत श्रीराम, आद्यगुरु समर्थ आणि स्वतःचे गुरु अनंतमौनी यांचे अत्यंत आदरपूर्वक व भाविकपणे त्यांनी वर्णन केलेले आहे. 'रामसोहळा' हा ग्रंथ 'दासबोधा'पेक्षाही मोठा आहे. त्यांत षड्दर्शनाचे सार असून, गुरुने शिष्यास दिलेल्या व्याख्यानांचे कांही किरकोळ टिपणपण दिसते.

९) आत्माराममहाराज येळकेहाळीकर

'श्रीदासविश्रामधाम' या प्रचंड ग्रंथाचे हे कर्ते होत. ते मूळचे नाघोर गांवचे

परंतु पुढे जेव्हा जिल्ह्यात येहळेगावी येथे मठात येवून राहिले. कल्याणस्वामींचे जे प्रमुख शिष्य रामचंद्र यांना कल्याणस्वामींनी फावलेल्या वेळात समर्थचरित्र सांगितले. ते त्यांनी अंतरी साठवून आपले शिष्य आत्माराम महाराज ह्यांना सांगितले. त्यामुळे आत्माराम महाराजांनी 'श्रीदासविश्रामधाम' नावाचा प्रचंड ग्रंथ चार खंडात लिहिला. त्यात समर्थांचे समग्र चरित्र पाहावयास मिळते. हा प्रचंड ग्रंथ बोधोवृत्तांत, गद्यासारखाच असून त्याचा एकंदर थाट रामदासी वाङ्मयास शोभेल असाच आहे. यात अनेक संत कवींची रचना पहावयास मिळते. ह्या ग्रंथाचे प्रचंड स्वरूप पाहून श्री. देव म्हणतात की, हा रामदासी संप्रदायाचा विश्वकोश आहे.

१०) <u>वेणाबाई</u>

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या शिष्यवर्गात ज्या थोड्याशा स्त्रिया होत्या त्यापैकी वेणाबाई हीच काय ती एकटी नाव घेण्यासारखी कवयित्री असून तिची बरीच कविता उपलब्ध आहे.

लहानपणापासूनच वेणाबाई शांतस्वभावी व विरक्तवृत्तीची होती. कारण वयाच्या १० व्या वर्षीच पतीचे निधन झाल्यामुळे उभे आयुष्य एकट्याने घालावे लागणार याची तिला कल्पना असल्यामुळे ती घरकामातून उरलेल्या फावल्या वेळात एकनाथी भागवत, रामायण ह्यासारखे धार्मिक ग्रंथांचे वाचन करीत असत. माहेरी आली तेव्हा समर्थांच्या मनाचे श्लोक, अभंग, पदे यांची अखंड पारायणे ती करी. त्यामुळे जननिंदेला पात्र झाल्यामुळे आई-वडिलांनी तिच्यावर विषप्रयोग करविला. परंतु समर्थकृपेमुळे ती वाचली. आणि पुढे समर्थांबरोबरच राहू लागली. समर्थांचे जेवण तयार करीत असे. तिच्याविषयी निरनिराळ्या आख्यायिका आहेत. तिचा मठ मिरजेस आहे. लहानपणी लिहिता वाचता येत होते व पुढे समर्थसान्निध्यात तिचे संस्कृतचेही थोडेबहुत अध्ययन झाले.

वेणाबाईची 'सीतास्वयंवर', दोन स्फुट प्रकरणे, अभंग व पदे इतकीच कविता उपलब्ध आहे. वेणाबाईची कविता अगदी साधी, घरगुती भाषेत रचलेली

आहे. मुक्तेश्वरी उच्च दर्जाचे काव्य या कवितेत नाही, परंतु स्त्रीस्वभावसहज मार्दव आणि सहृदयता या दोन गुणांनी युक्त आहे. वेणाबाईचे 'सीतास्वयंवर' हे ओवीबद्ध काव्य असून त्यात लग्नसमारंभाचे, तत्कालीन चालीरीतींचे, लग्न-पद्धतीचे, पक्वान्नादिकांचे जे वर्णन आले आहे ते ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे.

११) अक्काबाई उर्फ आऊबाई
------------------------

ह्या वेणाबाईच्या शिष्या होत. आपल्या अंगच्या विरक्तवृत्तीमुळे त्यांनी श्रीरामाचा अनुग्रह प्राप्त केला आणि थोडीशी कविता केली पण तिचा उल्लेख करण्याइतपत ती विपुल नाही. ही अक्काबाई एकदा तुळती सद्गुरूंतीर्थावर राहिली होती असे सांगतात. बालपणीच तिला श्रीरामदर्शन झाले होते व श्रीरामाला ती दही भाताचा नैवेद्य दाखवीत असता राम तिच्या ताटात जेवल्याची हकीगत तिचे शिष्य गिरिधर यांनी आपल्या 'समर्थप्रताप' ग्रंथाच्या ११ व्या समासात सांगितली आहे. आपल्या वयाच्या ८४ व्या वर्षी आऊबाई समाधिस्थ झाली. गिरिधर व त्यांचे बंधु त्रिंबक, यशवंत, भीम या चारी बंधूंनी अक्काबाईचा उपदेश घेतला होता.

समारोप
------

वैदिक धर्माच्या बंदिस्त स्वरूपामुळे आणि कर्मकांडाच्या प्राबल्यामुळे निरनिराळे धर्म, संप्रदाय निर्माण झाले. त्याच प्रेरणेने सोळाव्या शतकात हा रामदासी संप्रदाय उदयास आला. रामदासांच्या आधी जरी ह्या पंथाची परंपरा दाखवली जात असली तरी त्यांच्या आधीची गुरूपरंपरा हा ईश्वरीय अंश मानला जातो. त्यामुळे श्रीसमर्थ रामदास हेच ~~पहिले पुरुष~~ रामदासी संप्रदायचे संस्थापक मानले जातात.

महाराष्ट्रात, तेराव्या शतकात निर्माण झालेल्या ज्ञानदेव नामदेवांच्या भागवतधर्माचा धागा अबाधित ठेवून रामदासांनी त्या धर्माला आपल्या वैचारीक वृत्तीने राजकीय बैठक देवून लोकांच्या धार्मिक व राजकीय भावना उंचावल्या

आणि महाराष्ट्रात शिवाजीराजांचे राजकीय गुरु होवून 'हिंदवीस्वराज्याचे' स्वप्न साकार करण्यास मोठाच हातभार आपण व आपल्या महंताकरवी लावला.

अशा प्रकारे रामदासासारख्या चतुरस्त्र प्रज्ञाशील पुरुषाच्या सांप्रदायिक कार्याचा विचार केल्यावर असे मानावे लागते की, रामदासांनी भागवतधर्मातील सर्व संतांच्या कार्याचा वारसा घेवून, त्यात कालमानाला अनुसरुन स्वनिर्मित कर्तृत्वाची भर घातली आणि म्हणून "ज्ञानेश्वरांनी स्फूर्तिचांच्या ओजरुपाने सांगितलेला कर्मयोग व ज्ञानेश्वरीच्यारुपाने निर्मिलेली साहित्यदर्श, नामदेवाने दूरवर जावून लावलेले ज्ञानदीप, एकनाथांनी दाखविलेला समन्वयपंथ आणि तुकारामात दिसून येणारी भक्तीचा प्राण अशा संतमुख वैराग्यवृत्ती या सर्वांचा परमोच्च संगम रामदासस्वामीत आढळून येतो. पूर्वी होवून गेलेल्या चार श्रेष्ठांची कर्तृत्वे आपणामध्ये सामावून घेवून रामदासांनी त्यावर स्वतःच्या स्वतंत्र अशा कर्तृत्वाचा जो ध्वज फडकवला त्याला तर त्रिलिहासात तोडच नाही." अशी रामदासांच्या कार्याची मीमांसा करुन 'दास झालाचे कळस' असे डॉ. तुळपुळे म्हणतात ते यथार्थ वाटते.७

## निष्कर्ष

(१) रामदास संप्रदाय १७व्या शतकात आपले अस्तित्व दाखवू लागला होता.

(२) महाराष्ट्रही रामदासी संप्रदायाची कुप्यभूमी मान्य झाली आहे.

(३) वेगळा पंथ निर्माण होण्यासाठी सामाजिक परिस्थिती अतिशय अनुकूल होती.

(४) पंथाचे तत्त्वज्ञान हे राजकारण, हरिकथानिरुपण इ. अवलंबून आहे.

(५) रामदासानंतर पंथाला लागलेल्या ओहोटीचे यथायोग्य कारण शोधण्याचा जाणकारांनी योग्य प्रयत्न केला पाहिजे.

## संदर्भ


(१) महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास - ले. प्रा.इ.भो.शेणोलीकर व डॉ. प्र.न.देशपांडे, पृ.१४

(२) सार्थ ज्ञानेश्वरी - संपादन : शं.वा.दांडेकर, अध्याय १०, ओवी क्रमांक १८, पृ.२१६.

(३) संत तुकाराम अभंग गाथा

(४) म.सं.घडण आणि विकास - ले. प्रा.इ.भो.शेणोलीकर व डॉ. प्र.न.देशपांडे, 'रामदासांचे वेगळेपण' पृ.२५१.

(५) समर्थ दासबोध

(६) समर्थ दासबोध, अध्याय ११-५-४

(७) शं. दा. पेंडसे गौरवग्रंथ - ले. डॉ. शं.गो.तुळपुळे - 'दास झालासे कळस' पृ.


. . .